# भारतरत्न पं. भीमसेन जोशी

पं. सुजन राणे, प्लेन्सबरो, NJ



भारतरत्न पंडित भीमसेन जोशी २४ जानेवारी २०११ दिवशी कालवश झाले, ही बातमी भारतभर सर्व वृत्तपत्रांत व दूरदर्शन वाहिन्यांवर दुसऱ्या दिवशी झळकली. ते कालवश झाले असे म्हणण्यापेक्षा त्यांनीच काळाला वश करून घेतलं असं बोलण्यात अतिशयोक्ती होणार नाही असं मला वाटतं, कारण गेली ६० वर्ष त्यांनी मंचावर अधिराज्य केलं होतं. त्यांच्या निधनाने मला विशेष दुःख झालं याचं पहिलं कारण म्हणजे ते माझ्या गुरूंचे, पं. फिरोज दस्तूर यांचे गुरुबंधू होते. म्हणजे संगीताच्या दुनियेत जवळचं नातं होतं व दुसरं म्हणजे त्यांना त्यांच्या पुण्याच्या कलाश्री बंगल्यात दोन महिन्यांपूर्वीच भेटायचं भाग्य मला लाभलं होतं. बंगल्यापर्यंत पोहोचायला मला उशीर झाला, परंतु एवढे थोर गवयी व्हीलचेअरवर बसून माझ्यासाठी थांबले होते. मला बोलले, "माफ करा मला जास्त बोलवत नाही." ही नम्रता त्यांच्या थोरपणाची साक्ष देत होती. मी त्यांच्या पायाला स्पर्श करून नमस्कार केला. त्यावेळी जयंत या त्यांच्या मोठ्या चिरंजीवानी त्यांच्याबरोबर माझा फोटो काढला हे मी माझं परम भाग्य समजतो. अस्वस्थ प्रकृतीची चिन्हं स्पष्ट दिसत होती, पण इतक्या लवकर संगीताच्या दुनियेला सोडून जातील व जगातल्या त्यांच्या असंख्य चाहत्यांना हळहळत ठेवतील अशी पुसटशीसुद्धा कल्पना आली नाही. असो, गुरूच्या शोधार्थ वयाच्या १२/१३ व्या वर्षी त्यांनी घर सोडलं, तासन्‌तास रियाझ केला, ह्या सर्व गोष्टी सर्वश्रुत आहेत. परंतु त्यांची गायकी कां थोर होती याचा आढावा अशा वेळी घेण्याचा मोह टाळता येत नाही.

मी एक किराणा घराण्याचा गायक आहे आणि त्या दृष्टीने अमेरिकेतल्या तरुण गाणाऱ्यांनी व शास्त्रीय संगीताच्या विद्यार्थ्यांनी अशावेळी पं. भीमसेन जोशींच्या गायकीकडे चिकित्सक व शिकण्याच्या दृष्टीने पहावं हाच या लेखाचा उद्देश आहे. किंबहुना पं. जोशींचं गाणं त्यांना मार्गदर्शक ठरावं हे मला प्रखरतेनं वाटतं. सर्वप्रथम त्यांच्या गाण्यात अशी आर्तता होती, की गाणं सुरू होताच ती श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेई; श्रोत्यांचं मन अक्षरशः काबीज करून त्यांना दुसरा कुठलाही विचार करायला संधीच देत नसे. अगदी श्रोत्यांची एकाग्रता त्यांच्या गाण्यावर खिळवून टाकायची त्यांची ताकद होती. हा त्यांच्या गाण्याचा पहिला गुणधर्म व तो त्यांना कसा लाभला हे खचितच विचार करण्यासारखं आहे.

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात खांसाहेब अब्दुल करीमखान यांच्यासारख्या अमर गवयांनी किराणा गायकी हिंदुस्थानात घरोघरी पोहचवली. त्यांच्या हृदयस्पर्शी ध्वनिमुद्रिका 'गोपाला मेरी करुणा क्यू नही आवे' (राग - सरपर्दा), 'पिया बिन नाही आवत चैन' (राग - झिंझोटी), 'जमुनाके तीर' (राग - भैरवी) गेली ८० एक वर्ष अखंड भारतात लोक अजून ऐकतात. अशा करुणेनं भरलेल्या गायकीनं पं. भीमसेन जोशींना लहानपणापासून भारावलं. हीच करुणा भीमसेनजींच्या गाण्याच्या बुडाशी होती, ती त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. 'पिया बिन नाही आवत चैन' ही ध्वनिमुद्रिका लहानपणी एका दुकानात ऐकल्यापासून ती तळमळ त्यांच्या गाण्यात शेवटपर्यंत जणु काय प्रतिबिंबित होत होती आणि तीच तळमळ श्रोत्यांना त्यांच्या गाण्याकडे अखेरपर्यंत खेचत होती. पं. भीमसेनजींच्या आर्ततेचा उगम खांसाहेबांच्या कारुण्यामध्येच आपल्याला सापडतो. ती आर्तता खांसाहेबांच्या मुख्य शिष्याकडून म्हणजे सवाई गंधर्वांच्याकडून अवगत केली.

सुरुवातीचा षड्ज (सा) लावतानासुद्धा त्या त्या रागातील मंद्र सप्तकातील मध्यम, पंचम, धैवत आणि निषाद किंवा मध्य सप्तकातील रिषभ आणि गंधार या सुरांची आस घेऊन ते त्यांचा 'सा' पक्का करत, असा अनुभव येतो. ते एकदम 'सा'वर आदळत नाहीत. इथेच ते श्रुतीना किती महत्त्व देत होते ते आपल्याला कळते. नुसत्या १२ सुरांनी (७ शुद्ध, ४ कोमल आणि १ तीव्र) राग बनत नाही. प्रत्येक रागात या श्रुतीना काही वेगळं स्थान आहे आणि त्याप्रमाणे एखादा राग गायला नाही तर तो राग हवा तसा कानाला लागत नाही. थोडक्यात जर एखादा राग त्या श्रुतीना चिकटून गायला नाही तर तो आपल्या मनाचा कब्जा घेऊ शकत नाही. इथेच आपल्याला भीमसेनजींच्या गाण्याचा दुसरा पैलू सापडतो आणि म्हणूनच त्यांचं गाणं येवढं प्रभावी होत होतं. केवळ पुस्तकात लिहिलेले सूर गाऊन राग होत नाही, त्या त्या रागांचा आत्मा त्यांच्या गाण्यात भिनला होता असं म्हणावं लागेल. अशा श्रुती सितार किंवा सारंगीसारख्या तंतुवाद्यात सापडतात. तेव्हा आलापीमधे श्रुतींना किती महत्त्व आहे हे लक्षात ठेवण्यासारखं आहे. थोडक्यात एखाद्या रागाचं स्वरूप उभं करायचं सामर्थ्य त्यांच्या गाण्यात होतं. कित्येकदा ते विलंबित चिजेचे शब्द पूर्ण न गाता तानेच्या आधारे श्रोत्यांच्या समोर रागाचं चित्र मांडायचे. इथे त्यांचं कौशल्य त्यांच्या समकालीन गवयांत दिसत नाही. अनेकदा ते चिजेचे शब्द स्पष्ट उच्चारत नसत. एकदा तर त्यांनी चक्क आपला पत्ता गाऊन अस्थाई पूर्ण केली ! असं असूनसुद्धा त्यांचं गाणं लक्षात रहायचं कारण ते त्या त्या रागातल्या सुरांना स्वतःला पूर्ण वाहून आपलं गाणं सादर करत असत.

भीमसेनजींच्या गाण्याचा तिसरा पैलू म्हणजे त्यांचा गंभीर व सुरेल आवाज. निसर्गाने बालगंधर्व व लता मंगेशकरांना गोड आवाज दिला व तो नाट्यसंगीताला आणि सिनेसंगीताला पोषक होता. परंतु हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतासाठी आवाजात एक प्रकारचं वजन व जवार असावी लगाते, नुसता गळ्यातून किंवा नाकातून आवाज काढून चालत नाही. मुस्लिम गवई म्हणतात त्याप्रमाणे "आवाज गले में रहना चाहिए।" बैठकीच्या गाण्यात श्रोत्यांच्या मनावर गाणं चढवण्यासाठी धीरगंभीर आवाजाने सुरुवात करून हळूहळू तार सप्तकाच्या सुरांवर आघात करावा लागतो. ही किमया त्यांना चांगली साधली होती. अर्थात त्यांचा मुळातच आवाज बॅरिटोन (baritone) होता, ही वेगळी बाजू आहे. पण त्यांनी अफाट मेहनत घेऊन तो तंबोऱ्यात कसा मिळवायचा यावर प्रभुत्व मिळवलं होतं. किराणा घराण्यात आवाज गोलाकाराने लावतात; पण केसरबाई केरकरांच्या गाण्याने प्रभावित होऊन आपला आवाज ते मोठ्याने व आकारात लावत.

त्यांच्या गाण्याची आणखीन एक बाजू म्हणजे त्यांनी शास्त्रोक्त संगीतापासून ते नाट्यसंगीत, भक्तीसंगीत व काही वेळा

भावगीतापर्यंत आपलं गाणं समृद्ध केलं होतं. भक्तीसंगीतसुद्धा ते इतक्या तन्मयतेने गात असत, की ते हल्लीच्या तरुण गायकाना व शास्त्रीय संगीताच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक व्हावं. 'इंद्रायणी काठी देवाची आळंदी', 'माझा भाव तुझे चरणी' किंवा 'माझे माहेर पंढरी' ही भक्तीगीतं गाताना ते अक्षरशः आपल्या डोळ्यासमोर पंढरपूरचा विठोबा आणून ठेवतात असं वाटायचं. 'कान्होबा तुझी घोंगडी चांगली' यात ते अगदी कळस गाठतात. 'जो भजे हरिको सदा वोही परम पद पायेगा' ही भैरवी गाऊन त्यांनी कित्येक बैठकी श्रोत्यांच्या मनात कायम केल्या आहेत. तेव्हा भक्तीसंगीत गाताना एकाग्रतेने व ईश्वराची मूर्ति डोळ्यासमोर आणूनच गाणाऱ्यानी गायलं पाहिजे व ताल-मृदुंगाची साथ त्याला तेवढीच मजबूत असायला हवी; तरच ते श्रोत्यांपर्यंत पोहचते. भजनातले शब्द केवळ तालात गाऊन भजन यशस्वी होत नाही, त्यात गाणाऱ्याने त्याचा आत्मा ओतावा लागतो.

त्यांचा अखेरचा पैलू म्हणजे ते अत्यंत जिद्दीने व आत्मविश्वासाने गात असत. मला वाटते ही जिद्द आणि आत्मविश्वास गाणाऱ्यात अतिशय महत्त्वाची आहे, कारण त्याशिवाय त्याचं गाणं लोकांपर्यंत पोहचत नाही. मी एक विशेष गवयी आहे व माझं गाणं लोकांना आवडणारच हा आत्मविश्वास आणि जिद्द त्यांच्यात कायमची जागरूक असायची. ह्या बाबतीत त्यांचे कित्येक किस्से लोकांच्या परिचयाचे आहेत. त्यांच्या पेटीवादकाने, वालावलकरांनी सांगितलेला किस्सा मोठा गंमतीदार आहे. भारताच्या भूतपूर्व पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी त्यांना जेवायचं आमंत्रण पाठवलं होतं. ते म्हणाले, "मी जरूर येईन, पण आपण जर स्वयंपाक कराल तर!" इंदिरा गांधींना त्यांच्यासाठी स्वयंपाक करणं भाग पडलं. यात गाणाऱ्याचा आत्मविश्वास व स्वाभिमान प्रखरतेनं जाणवतो. तसंच काही वर्षांपूर्वी त्यांचं ठाण्याला गाणं होतं. तंबोरा जुळवायला त्यांना उशीर होत होता, त्यावर एक श्रोता मोठ्याने बोलला, "आम्ही कधी गाणं ऐकलं आहे की नाही?" भीमसेनजींनी हे ऐकल्यावर त्यांना तो अपमान सहन झाला नाही. त्यांनी आयोजकांना "त्या माणसाला हॉलच्या बाहेर ताबडतोब घालवलंत तरंच मी गाणं सुरू करीन" अशी अट घातली. तेव्हा त्या माणसाला हॉलच्या बाहेर घालवण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. नक्की आठवत नाही, पण उस्ताद अमीरखाँचं आणि भीमसेनजींचं गाणं एकाच मंचावर कलकत्त्यात किंवा दुसऱ्या कुठल्यातरी शहरी होतं. अमीरखाँच्या शागीर्दांनी काहीतरी युक्तिवाद करून त्यांचं गाणं भीमसेनजींच्या अगोदर ठेवलं. वास्तविक अमीरखाँ भीमसेनना ज्येष्ठ असल्यामुळे शिष्टाचाराच्या दृष्टीने त्यांचं गाणं नंतर ठेवायला हवं होतं. भीमसेनजींची फजिती करण्याचा त्यांचा हेतू होता. अमीरखाँनी राग दरबारी कानडा अगदी जमून गायला व त्यांचं गाणं झाल्यानंतर भीमसेनना विंगेत विचारण्यात आले की ते काय गाणार. त्यावर ते म्हणाले की ते दरबारी कानडा पेश करणार. तेव्हा आयोजक एकमेकांकडे विस्मयाने बघायला लागले. भीमसेननी त्यांना कारण विचारल्यावर ते म्हणाले की अमीरखाँनी तो राग नुकताच गायला. त्यावर भीमसेनजींचं प्रत्युत्तर होतं की म्हणून काय झालं. आता माझा दरबारी ऐका व ते दरबारी असे काही गायले की थोड्याच वेळात श्रोते अमीरखाँचा दरबारी पार विसरले. असा आत्मविश्वास गाणाऱ्याच्या यशाचा एक मुख्य घटक आहे. भीमसेनजी जरी किराणा घराण्याचे गवई होते तरी त्यांनी आपली भीमसेनी गायकी तयार केली होती आणि ती ताकद, तीव्रता आणि त्वेष ह्या तीन गुणांवर आधारलेली होती असं शेवटी म्हणावं लागेल.

**– पं. सुजन राणे**

**(पूर्वप्रसिध्दी – 'एकता')**

•••